

इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल युद्धाचे परिणाम देवरूखात

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

१४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण 'संरक्षित कवच'

पान ८



रत्नागिरी • शुक्रवार १३ मार्च, २०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० • वर्ष २२ • अंक १२३ • पाने ८ • ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in


# देशात इंधन टंचाई नाही

## केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांचा दावा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

सीएनजीचा पुरवठा १०० टक्के सुरू आहे आणि भारतात एलएनजीचे कार्गो दररोज येत आहेत. गॅस सिलिंडरबाबत कोणत्याही प्रकारे घाबरून जाण्याची गरज नाही. अफवांमुळे निर्माण झालेल्या घबराटीमुळेच मागणी वाढली आहे. देशात एलपीजीचे उत्पादन २८ टक्क्यांनी वाढले असून देश दीर्घकाळ या संकटाचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज असल्याची ग्वाही लोकसभेत केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी लोकसभेत बोलताना दिली.

लोकसभेत केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी पश्चिम आशियातील संकटानंतर देशातील गॅस टंचाईच्या मुद्द्यावर भाष्य केले. ते म्हणाले की, जगाच्या ऊर्जा इतिहासात क्वचितच असा काळ आला असेल, जो सध्या पश्चिम आशियातील संकटामुळे पाहायला मिळत आहे. जागतिक तेल आणि वायू पुरवठ्यासाठी ही स्थिती अत्यंत गंभीर मानली जात आहे. देशात सध्याच्या घडीला पुरेसा वायू साठा आहे. त्यामुळे गॅस सिलिंडरवरुन त्रस्त होण्याची गरज नाही, अशा शब्दांत त्यांनी सभागृहाच्या माध्यमातून देशाला आश्वस्त केले.

हरदीप पुरी यांनी आपल्या निवेदनात म्हटले की, 'होर्मुजमधून २० टक्के वाहतूक प्रभावित झाली

(पान २ वर)





### सिलिंडर बुकिंगसाठी शहरात २५ तर ग्रामीण भागात ४५ दिवसांची अट

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी लोकसभेत सांगितले की, आधुनिक ऊर्जा इतिहासात जगाने असा काळ कधीही पाहिला नाही. भारताची कच्च्या तेलाची पुरवठा स्थिती सुरक्षित आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मिळणाऱ्या तेलाच्या आयातीपेक्षाही जास्त आहे. संकटापूर्वी भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीपैकी सुमारे ४५ टक्के आयात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होत असे. पंतप्रधानांच्या उत्कृष्ट राजनैतिक संपर्क आणि विश्वासार्हतेमुळे, भारताने त्याच

(पान २ वर)

## विधानभवन उडवण्याची धमकी देणारा ई-मेल 'फेक'

**मुंबई (प्रतिनिधी)**



विधानभवनासह मुंबईतील ४ महत्त्वाच्या ठिकाणांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी एका निनावी ई-मेलद्वारे १२ मार्च रोजी दिवशी सकाळी देण्यात आली. यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण असले, तरी प्राथमिक अन्वेषणात हा 'हॉक्स' (खोटी धमकी) ई-मेल असल्याचे समोर आले आहे. राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि पंकज भोयर यांनी परिस्थिती स्पष्ट करत जनतेला घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे.

सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी एका मेलद्वारे विधानभवनासह मुंबईतील चार ठिकाणी बॉम्बची धमकी देण्यात आली होती, अशी माहिती विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिली. या चार ठिकाणांमध्ये विधान भवन, मुंबई शेअर बाजार, मुंबई मेट्रो, मुंबई उच्च न्यायालय यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे मेलमध्ये स्फोट होण्याची वेळ देखील देण्यात आली. त्यामुळे तपास यंत्रणा अधिक सतर्क झाल्या असल्याची माहिती राम शिंदे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

**नेमकी घटना काय ?**

सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी हा धमकीचा ई-मेल प्राप्त झाला होता. यामध्ये स्फोट घडवून आणण्याची वेळही देण्यात आली होती. यामध्ये मिसाईल हल्ल्याचाही उल्लेख होता. या घटनेची माहिती मिळताच पोलीस दल आणि 'बॉम्ब शोधक आणि नाशक पथक' यांनी तातडीने शोध मोहीम राबवली. धमकी मिळताच मुंबई पोलिसांनी संपूर्ण दक्षिण मुंबईत आणि विशेषतः विधानभवन परिसरात शोध मोहीम (सर्च ऑपरेशन) राबवले. विधानभवनाच्या सर्व प्रवेशद्वारांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून प्रत्येक येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तीची कसून पडताळणी केली जात आहे.

या संदर्भात गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, विधिमंडळ उडवून देण्याची धमकी मिळणे ही वस्तुस्थिती आहे; परंतु हा प्रशासनाचे लक्ष विचलित करण्याचा एक खोटा प्रयत्न (हॉक्स) आहे. भारताचे जागतिक स्तरावरील वाढते वलय पहाता मिसाईल आक्रमणाची शक्यता अत्यंत अल्प आहे.

(पान २ वर)

## वेचक

### दारूच्या नशेत २६ वर्षीय तरुणाची आत्महत्या

**लांजा (प्रतिनिधी) :** दारूच्या नशेत २६ वर्षीय तरुणाने घरातील वाशाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज गुरुवारी तालुक्यातील देवधे मणचेकर वाडी येथे घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लांजा तालुक्यातील देवधे मणचेकर वाडी येथील देवेंद्र राजेंद्र मणचेकर( वय २६) याला दारूचे मोठे व्यसन होते. यातूनच त्याने बुधवारी रात्री आपल्या आई-वडिलांशी भांडण करून त्यांना घरातून हाकलून दिले होते. त्यामुळे ते आपल्या पाली येथील नातेवाईकांकडे राहायला गेले होते. आज गुरुवारी दुपारी घरात कोणी नसताना देवेंद्र याने दुपारच्या सुमारास घरातील छपराच्या लाकडी वाशाला गळफास घेऊन आत्महत्या केली. देवेंद्र याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची बाब त्याचा भाऊ प्रथमेश मणचेकर याच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्याने देवेंद्र याला साडीचा फास सोडवून खाली उतरवले. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

### खेडशीत दहावीच्या विद्यार्थिनीची गळफास घेत आत्महत्या

**रत्नागिरी :** दहावीच्या परीक्षेत गणित विषयाचा पेपर कठीण गेल्याने दहावीतील विद्यार्थिनीने थेट आपलं आयुष्यच संपवल्याची घटना घडली आहे. रत्नागिरीतील खेडशी येथे हा प्रकार घडला. विद्यार्थिनीने बुधवारी दुपारी शाळेतून परतल्यानंतर घरात गळफास घेत आत्महत्या केली. अनुष्का अमित चिपरीकर (१६, खेडशी) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. बुधवारी दहावीचा विज्ञान विषयाचा पेपर होता. दुपारी पेपर सुटल्यानंतर विद्यार्थिनी घरी परतली. दहावीचा गणित विषयाचा पेपर कठीण गेल्याने विद्यार्थिनी प्रचंड तणावाखाली होती. याच तणावातून बुधवारी दुपारी अनुष्का हिने घरातच गळफास घेत आत्महत्या

(पान २ वर)

## आंबा- काजू पिकाच्या नुकसानीवर सरकार गंभीर; नुकसानभरपाई देणार

### ना. नितेश राणे यांनी व्यक्त केला विश्वास

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत शेतकरी संघटना प्रतिनिधी आणि मंत्री, आमदार, अधिकारी अशी बैठक लवकरच घेणार**

**सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी)**



बागायतदार शेतकरी ही माझी जनता आहे. ते रस्त्यावर असताना मी अधिवेशनात बसू शकत नाही! सरकार म्हणून मी जिल्हाधिकाऱ्यांसमवेत आपल्या मोर्चास सामोरे आलो आहे. आंबा आणि काजू पिकाचे यावर्षी मोठे नुकसान झाले आहे. माझ्या सूचनेनंतर ९० टक्के नुकसान झाल्याचा सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल शासनाकडे तातडीने सादर झाला आहे. नुकसान भरपाईसाठी

(पान २ वर)

## गुहागर येथील घरफोडी प्रकरणी ४ जण गजाआड

### स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने केली कारवाई

**गुहागर (प्रतिनिधी )**



गुहागर पोलीस ठाणे हद्दीतील शृंगारतळी बाजारपेठेत झालेल्या घरफोडीच्या प्रयत्नाचा छडा लावण्यात रत्नागिरी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मोठे यश आले आहे. या प्रकरणी मुंबईतील घाटकोपर आणि कुर्ला भागातून चार संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून सुमारे ११.९५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात घरफोडी, चोरी सारख्या यांसारख्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी व अशा गुन्ह्यांची उकल करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन दत्तात्रय बगाटे व अपर पोलीस अधीक्षक श्री. बी.बी. महामुनी यांनी सर्व पोलीस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले होते.

त्या अनुषंगाने गुहागर पोलीस ठाणे हद्दीतील शृंगारतळी बाजारपेठ येथील ओंकार ज्वेलर्स या दुकानात दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ०१.३१ वा. अज्ञात व्यक्तींनी दुकानाचे बाहेरील शटरचे लॉक तोडून आत प्रवेश करून आतील शटर तोडण्याचा प्रयत्न केला होता. या घटने प्रकरणी गुहागर

(पान २ वर)

## अटी मान्य केल्या तरच युद्ध थांबविणार

### इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी केले ट्विट


**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

इराणने अखेर दोन आठवड्यांपासून सुरू असलेला इस्त्रायल आणि अमेरिकेसोबतचा लष्करी संघर्ष संपवण्याची तयारी दर्शवली आहे. यापूर्वी इराणने आम्ही अमेरिकेसोबत १० वर्षे लढू असे सांगितलं होते. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील युद्ध लवकरच संपेल, असे संकेत दिले होते. आता इराणचे राष्ट्रपती मसूद

(पान २ वर)

## रत्नागिरी जिल्ह्याला भूकंपाचा सौम्य धक्का

**रत्नागिरी (विशेष प्रतिनिधी)**




रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गुरुवारी रात्री भूकंपाचा सौम्य धक्का बसला असून, नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीकडून मिळालेल्या माहितीनुसार, १२ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजून १९ मिनिटांनी हा भूकंप जाणवला. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता २.८ इतकी मोजण्यात आली आहे.

या भूकंपाचा केंद्रबिंदू रत्नागिरी भागातच हरचेरी असून अक्षांश १६.९२ उत्तर आणि रेखांश ७३.४४ पूर्व असा जमिनीखाली १० किलोमीटर खोलीवर होता.

भूकंपाची तीव्रता कमी असली तरी काही भागांतील नागरिकांना जमिनीला सौम्य कंप जाणवल्याने ते घराबाहेर पडले होते.

प्रशासन या परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## राजापूर दिवाणी न्यायालय इमारतीसाठी ७७.६३ लाखांची पुरवणी मागणी मंजूर

### आमदार किरण सामंत यांच्या पाठपुराव्याला यश

**राजापूर (प्रतिनिधी)**



राजापूर येथील दिवाणी न्यायालयाच्या मुख्य इमारतीच्या तळमजल्यावर व पहिल्या मजल्याच्या टेरेसवर पत्र्याची शेड उभारण्यासाठी राज्य शासनाकडून ७७.६३ लाख रुपयांची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली आहे. या कामासाठी लांजा-राजापूरचे आमदार किरण सामंत यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.

राजापूर दिवाणी न्यायालयाच्या इमारतीमध्ये पावसाळ्यात तसेच उन्हाळ्यात विविध अडचणी निर्माण होत होत्या. न्यायालयीन कामकाजासाठी येणारे वकील, कर्मचारी आणि नागरिक यांना संरक्षण मिळावे तसेच इमारतीचा उपयोग अधिक सुकर व्हावा या उद्देशाने तळमजला व पहिल्या मजल्यावरील टेरेसवर पत्र्याची शेड उभारण्याची मागणी करण्यात आली होती.

या मागणीची दखल घेत आ.किरण सामंत यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे ७७.६३ लाख रुपयांची

(पान २ वर)

## शिवसेना आणि धनुष्यबाण कोणाचा?

### ठाकरे-शिंदे गटाची 'फायनल राऊंड'साठी तयारी

**मुंबई**




गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात धगधगत असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाचा निकाल पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी पार पडली, मात्र पुढील सुनावणीसाठी अद्याप कोणताही 'मुहूर्त' निश्चित करण्यात आलेला नाही. दोन्ही बाजूंचा लेखी युक्तिवाद अभ्यासल्यानंतर सर्वोच्च न्यायालय पुढील तारीख जाहीर करणार असल्याने, या प्रकरणाचा सस्पेन्स आता अधिकच वाढला आहे.

गुरुवारच्या सुनावणीदरम्यान उद्धव ठाकरे गटाच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. दोन्ही गटांनी (ठाकरे आणि शिंदे) अंतिम युक्तिवादासाठी आपली तयारी दर्शवली आहे. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, या प्रकरणातील व्याप्ती मोठी असल्याने दोन्ही बाजूंचे लेखी मसुदे आधी अभ्यासले जातील आणि त्यानंतरच अंतिम सुनावणीसाठी वेळ निश्चित केली जाईल. पुढील तारीख सर्वोच्च

(पान २ वर)

## आयशर टेम्पोवर वडाचे झाड पडल्याने टेम्पोचे नुकसान

**राजापूर (प्रतिनिधी)**

राजापूर रेल्वेस्टेशन रस्त्यावरील दोनिवडे येथील मुख्य थांबा येथील जुनाट वडाचे झाड बुधवारी रात्री उभ्या करून ठेवलेल्या आयशर टेम्पोवर पडल्याने टेम्पोचे मोठे नुकसना झाले आहे. या घटनेने राजापूर रेल्वेस्टेशन रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या जुनाट झाडांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

तालुक्यातील विलये येथील श्री. तावडे यांच्या मालकीच्या आयशर टेम्पो (एमएच ०८ ए ९८३१) वर दोनिवडे येथील शरद करगुटकर चालक म्हणून काम करतात. बुधवारी रात्री ते रस्त्याच्या कडेला टेम्पो उभा करून घरी गेले होते. दरम्यान बुधवारी रात्री उभ्या असलेल्या



दोनिवडे येथे टेम्पोवर पडलेले वडाचे झाड

टेम्पोवर जुनाट वडाचे झाड पडले. यामुळे या टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे. यापुर्वी या वडाचा काही भाग भर दिवसा रस्त्यावरच पडल्याने या मार्गावरील वाहतून ठप्प झाली होती. यावेळी मोठी जिवीतहानी झाली असती, मात्र येथील तरूणाच्या प्रसंगावधानाने हा प्रसंग टळला. मात्र या घटनेने राजापूर रेल्वेस्टेशन रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या जुनाट झांडाचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

(पान २ वर)

## 'एस.टी'च्या ताब्यातील १ हजार ५०० हेक्टर जमिनींचा विकास करणार

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) ताब्यातील १ हजार ५०० हेक्टर जमिनींचा विकास करून महसूल वाढवला जाणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी दिली. या अतिरिक्त आणि मोकळ्या जागांचा परिणामकारक वापर करून महसूल वाढविण्यासह प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती साध्य करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

या संदर्भात महाराष्ट्र विधान परिषदेत अर्धा तास चर्चेची सूचना देण्यात आली होती. त्याबाबतची सविस्तर माहिती शासनाने सभागृहात मांडली असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ते म्हणाले, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मालकीच्या

(पान २ वर)

## मानधन तत्वावर नेमलेल्या शिपायांच्या मानधनात वाढ करा

### आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांची विधानपरिषदेत मागणी

**माखजन (वार्ताहर)**



महाराष्ट्र राज्यातील अनुदानित खासगी शाळांमध्ये नेमलेल्या मानधन तत्वावरील शिपायांना ५ हजार इतकं तुटपुंज मानधन दिले जाते. या विषयावर कोकण विभागीय शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी विधान परिषदेत लक्षवेधी मांडली.

सभागृहात बोलताना आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी वेतनेतर अनुदानामधून जे तुटपुंजे मानधन शिपायांना दिले जाते त्यातून घर खर्च देखील चालत नाही.या मानधनात सरकारने वाढ करावी अशी लक्षवेधी सूचना मांडली. तसेच महाराष्ट्र राज्यातील स्वयं अर्थसहायित शाळेतील २५% आर.टी.इ अंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे प्रतिपूर्ती

(पान २ वर)

## लांजा शहरात सिलिंडरसाठी ग्राहकांच्या लांबच लांब रांगा

### गॅस न मिळण्याच्या भीतीने सर्वसामान्य ग्राहक वर्ग धास्तावला

**लांजा (प्रतिनिधी)**

आखाती युद्धामुळे व्यावसायिक सिलिंडर मिळणे दुरापास्त झालेले असताना आता घरगुती गॅस देखील मिळणे मुश्किल होणार या भीतीने धास्तावलेल्या ग्राहकांनी लांजा येथील एचपी गॅसच्या केंद्रावर सकाळपासूनच मोठी गर्दी केली होती. गॅस मिळवण्यासाठी लोक रांगेने सिलिंडर घेऊन उभे असलेले चित्र यावेळी दिसून आले.

इराण विरूद्ध अमेरिका, इस्त्रायल युद्धाची झळ आता




लांजा येथील एचपी गॅस केंद्रावर ग्राहकांनी लावलेली रांग

थेट सर्वसामान्यांच्या चुलीपर्यंत पोहोचली आहे. इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावामुळे तसेच आखाती देशांत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे याचा मोठा फटका गॅस पुरवठ्याला बसला आहे. परिणामी

(पान २ वर)

## दापोलीत गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा

### व्यावसायिक सिलिंडर मिळेना; घरगुती व उज्ज्वला गॅस बुकिंगही ४५दिवसांनी

**दापोली (प्रतिनिधी)**

दापोली तालुक्यात सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून त्याचा थेट फटका हॉटेल व खानावळ व्यवसायाला बसत आहे. गेल्या काही दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने अनेक हॉटेल चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की काही हॉटेलधारकांना व्यवसाय सुरू ठेवणे कठीण झाले असून हॉटेल व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

दापोली शहरासह तालुक्यातील अनेक हॉटेल, उपाहारगृहे, नाश्त्याची दुकाने आणि खानावळींचा व्यवसाय पूर्णपणे गॅस सिलिंडरवर अवलंबून आहे. मात्र सध्या व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने त्याचा परिणाम व्यवसायिकांना होत आहे. काही वेळा अनेक दिवस प्रतीक्षा करूनही सिलिंडर मिळत नसल्याची तक्रार व्यावसायिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, केवळ व्यावसायिकच नव्हे तर घरगुती गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यातही मोठा विलंब होत असल्याचे चित्र दिसत आहे. सामान्य ग्राहक व पंतप्रधान उज्ज्वला योजनेअंतर्गत मिळणाऱ्या गॅसचे बुकिंग आता ४५ दिवसांनी होणार असल्याचा मॅसेज बुकिंग करताना येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक घरांमध्ये पुन्हा चुली पेटवण्याची वेळ येत

(पान २ वर)